संचालक, आत्मा
☎ कार्यालय : ०२० – २५५३ ६०१०
फॅक्स : ०२० - २५५३ ६००९
e-mail : diratmams@gmail.com

सत्यमेव जयते

जा.क्रं./एमएसीपी/पी.आय.यु.(कृषि)/पीपीपी पिप्रा/२४५९/१७
दिनांक :- २३/११/२०१७

प्रति,

प्रकल्प संचालक, आत्मा
सर्व

विषय :- महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत, सन २०१७-१८ मधील PPP पिक प्रात्यक्षिकांचे अंमलबजावणी बाबत.

संदर्भ :-१) PPP पिक प्रात्यक्षिक सन २०१७-१८ मार्गदर्शक सुचना
जा.क्रं./एमएसीपी/पीआययु(कृषि)/PPP पीक प्रात्यक्षिक/६५९/१७ दिनांक १५/०५/२०१७.
२) मा. आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक
जा.क्र./कृआ/विप्र-३/कंत्राटी शेती/३३२/१७ दिनांक १७/०६/२०१७.

उपरोक्त विषयास अनुसरून, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत, आपल्या जिल्ह्यात सन २०१७-१८ मध्ये राबविण्यांत येत असलेल्या पी.पी.पी. पिक प्रात्यक्षिकांचे अंमलबजावणी बाबत संदर्भिय पत्रानुसार, मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यांत आलेल्या आहेत.

संदर्भ क्रं. १ चे मार्गदर्शक सुचनेनुसार, पी.पी.पी. पिक प्रात्यक्षिकांतर्गत समाविष्ट खरेदीदार कंपनी व एमएसीपी शेतकरी उत्पादक कंपनी यांचे मध्ये Umbrella Agreement (MoU) करण्याबाबत कळविण्यांत आले आहे. तथापी कांही जिल्ह्यात Umbrella Agreement (MoU) स्टॅम्प पेपर ऐवजी साध्या कागदावर करण्यांत आले होते. त्यास कायदेशीर वैधता येत नाही. ही बाब विचारत घेता करारावर खरेदीदार कंपनीच्या वतीने जो स्वाक्षरी करणार आहे. अशी व्यक्ती संबंधीत कंपनीने स्वाक्षरीसाठी प्राधिकृत आहे, असा दाखला / ठराव कंपनीच्या लेटरहेड वर सही व शिक्यानिशी करारासोबत जोडावा.

उपरोक्त अडचणी विचारात घेता पी.पी.पी. पिक प्रात्यक्षिक या घटकाच्या अंमलबजावणीसाठी संदर्भ क्रं. २ चे मा. आयुक्त कृषि, यांचे परिपत्रकाचे अधिनराहुन सुधारीत "करारनामा" तयार करण्यांत आला आहे. त्याची प्रत सोबत जोडण्यांत आली आहे. यापुढे पी.पी.पी. पिक प्रात्यक्षिक या घटकाच्या अंमलबजावणीसाठी Umbrella Agreement (MoU) ऐवजी "पी.पी.पी. पिक प्रात्यक्षिक करारनामा" अवलंबवण्यांत यावा. तसेच सदर कामी आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेशी समन्वय साधन्यात यावा. प्रस्तुत करारनामा रू.५००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटरी करून घेणे बंधनकारक आहे. तसेच सदर कामी होणारा खर्च हा संबंधीत शेतकरी उत्पादक कंपनीने करावयाचा आहे.

सोबत :- १) करारनामा
२) परिशिष्ट -१
३) अधिकार पत्र

संचालक, आत्मा,
कृषि आयुक्तालय, पुणे.

प्रत,
१) मा. आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. प्रकल्प संचालक, एमएसीपी, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) विभागीय कृषि सहसंचालक, (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.
४) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व), यांना माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

## एमएसीपी - पी.पी.पी. पिक प्रात्यक्षिक - करारनामा

(रू.५००/- चे स्टॅम्प पेपरवर, नोटराईज्ड करणे बंधनकारक)

महाराष्ट्र शासन यांचे राजपत्र क्रमांक १५४ दिनांक ७ डिसेंबर २०१२ च्या अधिन राहून

हा करारनामा खालील लिहून देणार व घेणार यांचे मध्ये दिनांक . . . . . , वार : . . . .

महिना : . . . . वर्ष :. . . . . . . या रोजी तयार केला असून करारबध्द करण्यांत आला आहे.

१) लिहून घेणार : (एमएसीपी शेतकरी उत्पादक कंपनी)

नांव :

पत्ता :

२) लिहून देणार : (सहभागी खरेदीदार कंपनी)

नांव : (खरेदीदार कंपनीने खरेदीसाठी अधिकृत केलेले प्रतिनिधी)

पत्ता :

३) समक्ष : जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, . . . . . . .

नांव :

शिक्का :

: प्रकल्प संचालक, आत्मा, . . . . . . .

नांव :

शिक्का :

लिहून घेणार हा . . . . . जिल्ह्यातील . . . . . तालुक्यातील मौजे. . . या गावातील महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत स्थापन शेतकरी उत्पादक कंपनी असून कंपनीचे सभासद संख्या . . . . . . आहे. ते . . . . . . . . लिहून देणाराच्या . . . . . या पिकाचे कृषि उत्पादन घेण्यास इच्छूक आहेत आणि लिहून देणार हा लिहून घेणाराच्या उत्पादनाची खरेदी सोबतच्या परिशिष्ट -१ एक मध्ये नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यास तयार आहे, आणि लिहून घेणार या परिशिष्ट -१ प्रमाणे कृषि उत्पादन घेऊन लिहून देणारास पुरविण्यास इच्छूक आहे.

आता खालील साक्षीदारांच्या समक्ष लिहून घेणार व लिहून देणारांमध्ये सहमतीने हा करार मान्य करण्यांत आला आहे.

१) लिहून देणार हा लिहून घेणारास खालील बाबींवर सेवा पुरवेल.

अ)

ब)

क)

ड)

२) लिहून घेणार परिशिष्ट -१ मध्ये नमुद केल्यानुसार निश्चीत केलेल्या पिकाचे-वाणाचे, निश्चित केलेल्या गुणवत्तेनुसार आणि निश्चित केलेल्या प्रमाणात उत्पादन घेऊन लिहून देणारास . . . . ठिकाणी पुरवठा करेल. लिहून देणार हा लिहून घेणाराकडून परिशिष्ट -१ मध्ये नमुद केल्यानुसार निश्चित केलेल्या गुणवत्तेनुसार कृषि उत्पादन खरेदी करेल.

३) लिहून घेणार व लिहून देणारामध्ये समन्वयाने हा करारनामा परिशिष्ट -१ मध्ये नमुद केल्यानुसार व कालावधीसाठी कृषि उत्पादनाच्या पुरवठासंबंधी करारबध्द झाला असून कालावधी संपताच तो आपोआप रद्द होईल.

४) जर लिहून देणाराने स्वतःच्या कोणत्याही कारणामुळे लिहून घेणाराने उत्पादित केलेल्या कृषि माल खरेदी करण्यास असमर्थता दर्शविली अथवा नकार दर्शविला तर लिहून घेणारास उत्पादित कृषि मालाची नियमित बाजार पेठेत करारातील वैध कालावधीत विक्री करण्यास मोकळीक राहील आणि त्याला करारामध्ये नमुद केलेल्या दरापेक्षा कमी दराने मोबदला मिळाल्यास, लिहून देणारास फरकाची रक्कम लिहून घेणारास त्याने मागणी केलेल्या तारखे पासून पंधरा दिवसांच्या आत अदा करावी लागेल.

५) लिहून देणाराने . . . . . . या नियोजित वेळी व . . . . . . या ठिकाणावरून कृषि उत्पादनाची उचल करेल अशी जबाबदारी निश्चित करण्यांत आली आहे. असे नियोजित वेळेपासून तीन दिवसांच्या आत न केल्यास, लिहून घेणार सदर कृषि मालाची नियमित बाजारपेठेत कुठेही विक्री करू शकेल. करारानुसार निश्चित किंमत आणि विक्री किंमतीतील फरक उद्‌भवल्यास लिहून देणार हा लिहून घेणारास देईल.

६) करारामध्ये दुरुस्ती / बदल, विलीनीकरण, समाप्ती, इ. दोन्ही लिहून घेणार व लिहून देणार यांच्या एकत्रित सहमती / संमतीने होईल. असे दुरुस्ती / बदल, विलीनीकरण, समाप्ती इ. बाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व प्रकल्प संचालक, आत्मा यांना बदलाच्या तारखेपासुन १५ दिवसांच्या आत कळविणे आवश्यक राहील.

७) लिहून देणाराने सदर करारनामा स्वाक्षरीनंतर संबंधित अधिका-याकडे (समेट अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी) सादर करण्याचे मान्य केले आहे.

८) या करारनाम्यांच्या अंतर्गत लिहून घेणार व लिहून देणार यांच्या मध्ये अटी व शर्तीबाबत काहीही विवाद उद्‌भवल्यास, असे विवाद प्रथम सामोपचाराने मिटवावेत. त्यानंतर समाधान न झाल्यास असे विवाद समेट अधिका-याकडे सादर करुन मिटवावेत. याबाबत समेट प्राधिका-याकडे (जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी) ३० दिवसांच्या आत लेखी तक्रार नोंदवावी. तक्रार नोंदविताना नेमका कोणत्या बाबीचा कराराच्या अनुषंगाने उल्लंघन झाले आहे, ते सुस्पष्टपणे मांडावे. समेट अधिकारी (जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी) याबाबत १५ दिवसांच्या आत तोडगा काढतील. तक्रार दाखल झाल्यानंतर तक्रारीतील आशय आणि करारातील अटी व शर्ती इ. सांगोपांग विचार करून समेट प्राधिकारी योग्य तो निर्णय दोन्ही पक्षकारांना कळवेल.

९) समेट अधिका-याने (जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी) काढलेल्या तोडग्याशी लिहून घेणार व लिहून देणार हे दोन्ही किंवा एक समाधानी नसतील तर ते पुढील ३० दिवसात अपिलिय अधिकरी (मा.आयुक्त कृषि) यांचेकडे अपिल करतील.

१०) अपिलिय प्राधिकारी समेट प्राधिका-याकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने ३० दिवसांच्या आत निवाडा करेल. या निवाड्यास दिवाणी न्यायालयाचा दर्जा असेल. अपिलिय प्राधिका-याच्या निर्णयामुळे पक्षकाराचे समाधान न झाल्यास त्याला कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

११) सर्व तक्रारींच्या बाबतीत वरील प्रमाणेच कार्यवाही करण्यांत येईल आणि त्यास इतर न्यायालयात त्याची दखल घेतली जाणार नाही.

१२) लिहून घेणार व लिहून देणार यांच्या पत्यात काही बदल झाल्यास तो समेट अधिका-यांकडे (जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी) व प्रकल्प संचालक, आत्मा ७ दिवसांच्या आत कळवतील.

१३) लिहून घेणार व लिहून देणार एकमेकांसोबत कराराच्या अनुषंगाने त्यांच्याशी संबंधित कामकाजाच्या अनुषंगाने चांगले भरवश्याने, विश्वासपुर्वक, मेहनतीने, सचोटीने वर्तवणुक करतील आणि एकमेकांना हानी पोहोचेल असे कोणतेही काम / कृती करणार नाहीत.

१४) लिहून घेणार व लिहून देणार महाराष्ट्र शासनाच्या कराराच्या अनुषंगाने संबंधित विभागांची वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिनियम, नियम-कायद्याचे / मार्गदर्शक सुचनांचे अनुपालन करतील.

१५) ज्या पिकांना किमान आधारभुत किंमत (MSP) लागू आहे त्यासाठी -
लिहून घेणार यांनी उत्पादित केलेल्या मालाला लिहून देणार हा खरेदीच्या दिवशी शासना मार्फत निर्धारीत केलेल्या किमान आधारभुत किंमत (MSP) एवढी किंमत देण्यास राजी / तयार आहे. लिहून देणारावर हे बंधनकारक आहे. तथापि लिहून देणार हा किमान आधारभुत किंमत (MSP) पेक्षा जास्त दर देऊ शकतो. हे लिहून घेणार व लिहून देणार यांच्या समन्वयाने ठरेल.

१६) ज्या पिकांना किमान आधारभुत किंमत (MSP) लागू नाही त्यासाठी -
लिहून घेणार यांनी उत्पादित केलेल्या मालाला लिहून देणार हा . . . . या दराने खरेदी करण्यास राजी / तयार आहे. लिहून देणारावर हे बंधनकारक आहे.

१७) सदर करारनामा लिहून घेणार व लिहून देणार आज दिनांक........ वार......महिना.......वर्ष ... रोजी खालील उपस्थितांच्या साक्षीने राजीखुशीने स्विकृत केला आहे.

लिहून घेणाराचे नाव, स्वाक्षरी आणि मोहोर
(शेतकरी उत्पादक कंपनी)

साक्षीदार

१...............................

२...............................

लिहून देणाराचे नाव, स्वाक्षरी आणि मोहोर
(खरेदीदार कंपनी)

साक्षीदार

१...............................

२...............................

समक्ष, प्रकल्प संचालक, आत्मा
नाव, स्वाक्षरी आणि मोहोर

समक्ष, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
नाव, स्वाक्षरी आणि मोहोर

परिशिष्ट - १

**एमएसीपी - पी.पी.पी. पिक प्रात्यक्षिक - करारनामा**

**कराराचा दिनांक :** **कराराचा कालावधी :**

| अ.क्रं. | करार करण्यांत आलेल्या शेतमालाचे नांव | शेतमालाची किमान प्रतवारी (FAQ Standard) | करारा अंतर्गत निश्चित करण्यांत आलेले दर (प्रति क्विं.) | शेतमाल खरेदीचे ठिकाण | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गांव | तालुका | जिल्हा |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

लिहून घेणाराचे नाव, स्वाक्षरी आणि मोहोर
(शेतकरी उत्पादक कंपनी)

साक्षीदार

१..............................

२..............................

लिहून देणाराचे नाव, स्वाक्षरी आणि मोहोर
(खरेदीदार कंपनी)

साक्षीदार

१..............................

२..............................

समक्ष, प्रकल्प संचालक, आत्मा
नाव, स्वाक्षरी आणि मोहोर

समक्ष, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
नाव, स्वाक्षरी आणि मोहोर

# अधिकार पत्र

(खरेदीदार कंपनीचे लेटर हेडवर)

जा.क्रं. दिनांक :

प्रमाणित करण्यांत येते की, . . . . . . . या खरेदीदार कंपनी तर्फे श्री.. . . . . . . . . . . . पदनाम. . . . . . . यांना खरेदीदार कंपनी मार्फत . . . . . . . . . . . या शेतकरी उत्पादक कंपनी सोबत करार करण्यास व करारावर स्वाक्षरी करण्यास . . . . . . . या खरेदीदार कंपनीच्या वतीने संपुर्ण अधिकार देऊन प्राधिकृत करण्यांत येत आहे.

स्थळ :-

सही/-

सक्षम प्राधिकारीचे नांव : श्री.

खरेदीदार कंपनीचे नांव :

शिक्का / मोहर :

(सदर अधिकारपत्र हे एमएसीपी - पी.पी.पी. पिक प्रात्यक्षिक - करारनामा नोटराईज करतेवेळी जोडणे आवश्यक आहे.)